भारतीय वन अधिनियम १९२७ कलम २८-A अनुसार अनुसूचित क्षेत्रातील गौण वनोपजाकरीता पंचायत आणि ग्रामसभाद्वारे वाहतूक परवाना निर्गमित करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र. बांबूसा-२०१५/प्र.क्र.११२/फ-९
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ८ एप्रिल, २०१५

वाचा :-

प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१६/आर-३/बांबू विल्हेवाट/ प्र.क्र. ९४/ जी-१३६/२०१४-१५, दिनांक १२.३.२०१५

शासन निर्णय :-

मा. राज्यपाल यांच्याकडील अधिसूचना क्रमांक RNI No. MAHENG/२००९/ ३५५२८ Reg No. MH/MR/South-३४४/२०१४-१६, दिनांक ३०.१०.२०१४ अनुसार अनुसुचित क्षेत्रासाठी भारतीय अधिनियम, १९२७ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणेनुसार कलम २८-A अन्वये अनुसूचित क्षेत्र गौण वनोपजासंदर्भात वाहतूक परवाना देण्याचे अधिकार योग्य पातळीवर पंचायत आणि ग्रामसभा किंवा तत्संबंधी समितीकडे देण्यात आलेले आहे.

वरील संदर्भानुसार अनुसूचित क्षेत्राकरीता गौण वनोपजासाठी वाहतूक परवानाचा (Transit Permit) नमूना प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी शासनमान्यतेसाठी सादर केला आहे. त्यास, अनुसरुन सोबत सहपत्रित नमून्यास याद्वारे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

वाहतूक परवानाचा (Transit Permit) संदर्भात कार्यप्रणाली पुढील प्रमाणे राहील :-

१. सदर निर्गत परवान्याचा रंग फिका हिरवा (Light Pista Green) असावा.

२. संबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी परवाना पुस्तकाचे मुद्रण शासकीय मुद्रणालयातून करून घ्यावे. वाहतूक परवाना पुस्तक ५० पानाचा राहील.

३. शासकीय मुद्रणालयाकडून यावर (दर्शविल्याप्रमाणे) वॉटर मार्क अंकीत केला जाईल.

४. सदर नमूना घडी पत्रक (४ घडीचे) पासचा राहील. त्यामध्ये स्थळप्रत, पंचायत / ग्रामसभा / समितीची प्रत, संबंधित बिट गार्डची प्रत व वाहतूक कर्त्याची प्रत याचा समावेश राहील.

५. वाहतूक पास जारी केल्यानंतर ४८ तासांच्या आत संबंधित ग्रामसभेकडून बिट गार्डची प्रत संबंधित बिट गार्डकडे देण्यात येईल.

६. विभागीय अधिकाऱ्यांचे / उप वनसंरक्षकांचे कार्यालयीन शिक्का घडीचे रेषेवर तीन ठिकाणी जेथे घडीची रेषा आहे, तेथे दोन्ही बाजूस अर्धा-अर्धा अशा स्वरूपाचा चिन्हांकित केला जाईल.

७. वन विभागाद्वारे क्षेत्रीय पातळीवर पंचायत / ग्राम सभेच्या मागणीनुसार विनामुल्य वाहतूक परवाना पुस्तकाचा पुरवठा करण्यात येईल.

८. एक निर्गत परवाना पुस्तक संपल्यानंतर (Counterfoil) स्थळप्रत ची पुस्तक संबंधित वन कार्यालयास (जेथून प्राप्त झाले होते) परत करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(डॉ.यु.एम.फारुकी)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :-
१. प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
५. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६. प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर
७. प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि महासंचालक, सामाजिक वनीकरण, पुणे.
८. प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), पुणे.
९. विभागीय आयुक्त (सर्व)
१०. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अकाष्ठ वनोपज, सनियंत्रण व मुल्यांकन), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
११. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१२. जिल्हाधिकारी (सर्व)
१३. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) आणि (वन्यजीव) (सर्व)
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१५. पोलीस अधिक्षक (सर्व)
१६. अपर आदिवासी आयुक्त (सर्व)
१७. उपवनसंरक्षक (प्रादेशिक) आणि (वन्यजीव) (सर्व)
१८. निवडनस्ती फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२